# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-2557266/46
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in


क्र.तंशिस/विकाना/शैवि-१/ २०२२/ ३५९९ दिनांक:- 18 NOV 2022

प्रति,

प्राचार्य/ संचालक,
सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था
नागपूर विभाग, नागपूर

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रिभुत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ:- १. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०२२/३८२, दि. १८/११/२०२२

२. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. १०/एडीएम/Intake Approval/२०२२/५७८, दि. ११/०७/२०२२

३.राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचा दि. १५/११/२०२२ रोजीची संचालनालयास प्राप्त ई-मेल संदेश

या विभागाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थेबाबत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता शिखर परीषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठाकडून संलग्नता/ समकक्षता प्रदान केल्याची माहिती ऑनलाईन पद्धतीने अद्यावत करण्याबाबत संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये कळविण्यात आलेले होते. मात्र शिखर परीषदेची मान्यता, शासन मान्यता, विद्यापीठाचे संलग्निकरण नसल्यामुळे औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांना सदर माहिती अद्ययावत करता न आल्यामुळे संस्थांच्या मागणीवरुन माहिती सादर करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तरी संदर्भिय प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचा दिनांक १५/११/२०२२ रोजी संचालनालयास प्राप्त ई-मेल व्दारे कळविल्यानुसार सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यांत येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेची माहिती दिनांक ०५/१२/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी. माहिती अद्ययावत करताना ती अचुक असेल याची विशेष दक्षता घ्यावी. मंजुर प्रवेश क्षमतेची माहिती हि प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रीयेमध्ये काही अडचणी उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य/ संचालक जबाबदार राहतील.

उपरोक्त मुदतीत संस्थांनी माहिती अद्ययावत न केल्यास, परीणामस्वरुपी संस्थेचा समावेश केंन्द्रीभुत प्रवेश प्रक्रीयेत न झाल्यास होणाऱ्या परीणामास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार असेल या बाबीची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर